इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

कार्यक्रम पत्रिका क्र. (७/२०२६)

विशेष सभा

प्रति.

दि. २२/०७/२०२६

मा. ------------------------------------------------------------

नगरसेवक / नगरसेविका,

इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

महोदय,

इचलकरंजी महानगरपालिकेच्या मा. सदस्य यांना नोटीस देणेत येते की इचलकरंजी महानगरपालिकेची विशेष सभा सोमवार दि. २७/०७/२०२६ रोजी दुपारी १२:१५ वाजता इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे भरविणेत येत आहे.

तरी सदर सभेस उपस्थित राहणेबद्दल आपणास विनंती करणेत येत आहे.

**परिशिष्ठ**

विषय क्र. ०१ : इचलकरंजी महानगरपालिका हद्दिमध्ये घरोघरी कचरा संकलन करणेकामी तयार करणेत आले र.रु. २२,००,१८,३२२/- चे अंदाजपत्रक स्थायी समिती ठराव क्र.३९/दि.१५/७/२०२६ नुसार नामंजुर करणेत आले असलेने सदरचे अंदाजपत्रक मंजूरी कामी मा.महासभेमध्ये निर्णय होणेबाबत.

मा. महापौर, इचलकरंजी महानगरपालिका यांचे

दि. २२/०७/२०२६ चे आदेशानुसार.

(राहुल बा. पोटे)

प्र.नगरसचिव

इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

मा. महासभा क्र. ०७
विशेष सभा

ठराव क्र. १७२
दि. २७/०७/२०२६

विषय क्र. ०१ : इचलकरंजी महानगरपालिका हद्दिमध्ये घरोघरी कचरा संकलन करणेकामी तयार करणेत आले र.रु.२२,००,१८,३२२/- चे अंदाजपत्रक स्थायी समिती ठराव क्र. ३९ / दि. १५/७/२०२६ नुसार नामंजुर करणेत आले असलेने सदरचे अंदाजपत्रक मंजूरी कामी मा.महासभेमध्ये निर्णय होणेबाबत.

## ठराव

इचलकरंजी शहरामध्ये घरोघरी जाऊन कचरा गोळा करणेचे काम मक्तेदार नितीन डी. कदम (LLP) यांचेकडुन सुरु आहे. तथापि नियोजित वेळेनुसार घरोघरी घंटागाडी मार्फत कचरा संकलन व उठाव न होणे,कचरा संकलनासाठी आवश्यक मनुष्यबळ व वाहनांची उपलब्धता नसणे तसेच कोणतीही पूर्वकल्पना न देता वारंवार कर्मचाऱ्यांकडून संप करणे या गोष्टी वारंवार घडत असल्यामुळे घरोघरी कचरा गोळा करणेच्या कामावर मोठा परिणाम होत असून शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होत आहे व नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे.

संबंधित मक्तेदार यांना कार्यालयाकडुन वेळोवेळी तोंडी सूचना, लेखी नोटीस व दंडात्मक कारवाई करुनही त्यांच्या कामकाजामध्ये सुधारणा झालेली नाही. मक्तेदार यांनी करारातील अटी व शर्तीचा भंग केलेला आहे.त्यामुळे नागरिक व नगरसेवकांच्या तक्रारी आणि शहराचे आरोग्याचा विचार करुन मक्तेदार नितीन डी. कदम (LLP) यांचा कामाचा मक्ता रद्द करुन याकामी नव्याने निविदा प्रक्रिया करुन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी मक्तेदार नितीन डी. कदम (LLP) यांचे कडुन काम करुन घेणेत यावे. असा ठराव मा.महासभा ठराव क्र.२८/दि.३०/०४/२०२६ नुसार मंजुर झाला आहे.

त्यानुसार घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०२६ ची प्रभावी अंमलबजावणी करणेकरीता शहरातील झोपडपट्टी भाग, बाग बगिचे, ऑक्सिजन पार्क, मार्केट, हॉटेल्स, कार्यालये यामधील निर्माण होणारा कचरा स्वतंत्र रित्या संकलन, वाहतुक करणे त्यावर आवश्यक प्रक्रीया करणे तसेच केंदाळ निर्मुलन, सारण गटर स्वच्छता, आवश्यक वाहने व यंत्रसामुग्री पुरवठा करणे, रँप तयार करणे (चढण – उतार मार्ग) महानगरपालिका मुख्य इमारत व विभागीय कार्यालय स्तरावरील निरीक्षण प्रणाली, इ. बाबींचा समावेश असलेले र.रु. २२,००,१८,३५२/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करुन सदर अंदाजपत्रक मंजुरीबाबत कार्यालयाने मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर केला होता.पण स्थायी समिती ठराव क्र. ३९ दि. १५/०७/२०२६ नुसार सदरचा प्रस्ताव बहुमताने नामंजुर करणेत आला होता.

मात्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ नुसार शहराची साफसफाई करणे, कचऱ्याची विल्हेवाट लावणे, नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करणे हे महापालिकेचे आवश्यक कर्तव्य आहे. दि.३०/०४/२०२६ रोजी नितिन डी. कदम (LLP) या कंपनीचा ठेका रद्द करणेत आला असून निविदा प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत सदरचे काम त्यांचेकडून करुन घेणेत येत असल्याने त्यांचेकडून समाधानकारक काम होत नसलेच्या नागरिकांच्या व सदस्यांच्या तक्रारी वाढल्या आहेत. नविन घनकचरा अधिनियम २०२६ व मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश विचारात घेता शहर स्वच्छता व नागरी आरोग्याचेकामी हयगय अथवा वेळकाढूपणा करता येणार नाही, ही सामुहीक जबाबदारी आहे. याकरीता स्थायी समितीमध्ये सदर अंदाजपत्रक नामंजुर झालेच्या पार्श्वभुमीवर मा.स्थायी समिती सभापती व अन्य ४ स्थायी समिती सदस्य यांनी विशेष सभा बोलावून मा.महासभेत याबाबत निर्णय होणेबाबत मा. महापौर यांना दि.१६/०७/२०२६ चे पत्राने विनंती केली होती.

त्यानुसार मा.महापौर यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ महानगरपालिका स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादींचे कामकाज यातील कलम १ महानगरपालिकेच्या कामकाजाचे नियमन करण्यासंबंधी तरतुदी पोटकलम (ड) महापौरास त्यांस योग्य वाटेल तेव्हा विशेष सभा बोलविता येईल या तरतुदीनुसार स्थायी समितीमध्ये बहुमतांनी नामंजुर झालेला प्रस्ताव आजच्या विशेष सभेमध्ये मंजुरीसाठी सादर केला आहे.

महानगरपालिका अधिनियमानुसार महासभा सर्वोच्च आहे. कामांची निविदा विहीत अधिकाराप्रमाणे मंजुर करणेचे अधिकार स्थायी समितीस आहेत. तथापि कामाचे अंदाजपत्रकास स्थायी समितीचीच मंजुरी घेतली पाहीजे असे अधिनियमात कोठेही नमूद नाही या सर्व बाबींचा विचार करुन इचलकरंजी शहरातील नागरिकांच्या आरोग्यासाठी तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०२६ ची प्रभावी अंमलबजावणी, तसेच या संबंधी मा.जिल्हाधिकारी यांचे इचलकरंजी महानगरपालिकेस दि.२२/०७/२०२६ रोजी प्राप्त निर्देश याचा विचार करुन शहरातील झोपडपट्टी भाग, बाग बगीचे, ऑक्सिजन पार्क, मार्केट, हॉटेल्स, कार्यालये यामधील निर्माण होणारा कचरा स्वतंत्र रित्या संकलन, वाहतुक करणे त्यावर आवश्यक प्रक्रीया करणे तसेच केंदाळ निर्मुलन, सारण गटर स्वच्छता, आवश्यक वाहने व यंत्रसामुग्री पुरवठा करणे, रँप तयार करणे (चढण - उतार मार्ग), महानगरपालिका मुख्य इमारत व विभागीय कार्यालय स्तरावरील निरीक्षण प्रणाली इ. बाबींचा समावेश असलेले र.रु. २२,००,१८,३५२/- चे अंदाजपत्रक मंजुर करणेत येत असून याकरीता निविदा प्रक्रीया राबविणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : (सही) विठ्ठल पुंडलिक चोपडे          अनुमोदक : (सही) सतिश वसंतराव मुळीक

ठराव सर्वानुमते मंजूर

(सही)

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner